अनिल अंबानी यांची डिफेन्स कंपनीही दिवाळखोरीत

■ गांधीनगर

उद्योगपती अनिल अंबानी यांची डिफेन्स सेक्टरमधील कंपनी देखील दिवाळखोरीत निघाली आहे. अनिल अंबानी यांच्या इतर अनेक कंपन्या दिवाळखोरीत गेल्या आहेत तर काही दिवाळखोरीच्या मार्गावर आहेत. आता अहमदाबाद मधील एनसीएलटी न्यायाधीकरणाने डिफेन्स सेक्टरमधील कंपनीच्या दिवाळीखोरीचा मार्ग मोकळा केला आहे. याच कंपनीच्या माध्यमातून भारतात फ्रान्सचे फायटर जेट राफेल दाखल झाले होते. ही कंपनी आता दिवाळखोरीत निघाल्याने विरोधकांना केंद्र सरकारविरोधात आयते कोलीतच मिळाले आहे. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून फ्रान्सच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात अनेक करार होण्याची शक्यता आहे. सध्या फ्रान्स निर्वासीतांच्या दंगलीप्रकरणात गुरफटलेला आहे. त्याचवेळी हा दौरा होत आहे. या दौऱ्यात पंतप्रधान संरक्षण क्षेत्रातील मोठा करार करण्याची शक्यता आहे. ते नौसेनेसाठी राफेल एमची खरेदी करण्याची शक्यता आहे. मात्र या दिवाळखोरीमुळे राफेलच्या संपूर्ण प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.

कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या

बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुभाष देसाई यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास उपस्थित राहून महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे संजय पावसे, मनोहर परब, सुहास नलावडे अणि इतर कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या.

आमदार रवी राणा यांना जीवे मारण्याची धमकी

■ अमरावती

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ यांच्यानंतर आता अमरावतीचे अपक्ष आमदार रवी राणा यांना देखील जीवे-मारण्याच्या धमकीचा फोन आला आहे. छत्रपती संभाजीनगर मधून ही धमकी देण्यात आल्याचे त्यांचे स्वीय सहाय्यक विनोद गुहेंनी यांनी म्हटले आहे. याप्रकरणी अमरावतीच्या राजपेठ पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आली आहे. रवी राणा यांच्या मोबाईलवर संभाजीनगर येथील एका व्यक्तीने संपर्क साधला. महाराष्ट्रात फिरणे बंद करा, अन्यथा तुमच्या जिवाचे बरेवाईट करू, अचानक काही घडले किंवा अपघात झाला, तर काही म्हणू नका. तुमच्यावर मी व माझे कार्यकर्ते लवकरच हल्ला करणार आहेत. अशी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

समृद्धी महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढल्यामुळे एअर ॲम्ब्युलन्स सेवा

■ मुंबई

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर अपघातांच्या घटना वाढत असल्यामुळे राज्य सरकारने या महामार्गावर एअर म्ब्युलन्स सेवा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी अनेक हेलिकॉप्टर कंपन्यांशी राज्य सरकारने चर्चा सुरु केली आहे. या चर्चेनंतर एअर म्ब्युलन्स सेवा प्रत्यक्षात राबवली जाणार आहे. एअर म्ब्युलन्सने आणलेल्या जखमींना त्वरीत उपचार मिळावेत, यासाठी नागपूर ते मुंबईदरम्यान महामार्गाजवळ असणाऱ्या खासगी रुग्णालयांसोबत राज्य सरकार करार करणार आहे.

यामुळे जखमींना केवळ सरकारीच नाही,तर खासगी रुग्णालयांमध्येही तातडीने उपचार शक्य होणार आहेत. दरम्यान, प्रवासादरम्यान विश्रांती घेण्यासाठी समृद्धी महामार्गावर ठिकाण नसल्यामुळे अपघात होत असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे आता या महामार्गावर फुडमॉल सुरू करण्याच्या हालचालींनाही वेग आला आहे. यावर आता सरकारने समृद्धी महामार्गावर रस्त्यालगतच्या सोयीसुविधा (वे-साइड सुविधा) देण्यासाठी निविदा मागवल्या. याआधीही यासंदर्भात टेंडर काढण्यात आले होते, या टेंडरला प्रतिसाद मिळाला नाही. आता राज्य सरकारने पुन्हा टेंडर काढले आहे.

धुळ्यात शस्त्रसाठा जप्त ठाणे पोलिसांची कारवाई

■ ठाणे

ठाण्याच्या वागळे स्टेट पोलीस ठाण्यात दाखल हत्यार विक्री गुन्ह्यातील फरार आरोपीस ठाणे गुन्हे शाखेच्या पथकाने मध्य प्रदेश-महाराष्ट्र सीमेवरील धुळ्याच्या पळासनेर या गावातून अटक केली. या आरोपीच्या ताब्यातून एक मशीनगन, देशी बनावटीचे २० पिस्तुल, २ मॅगझीन आणि २८० जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त केला.

वागळे स्टेट पोलीस ठाण्यात सुजितसिंग उर्फ माजा आवसिंग (२७) याच्या विरोधात हत्यार प्रतिबंधक कायदानुसार गुन्हा दाखल आहे. हा आरोपी फरार होता. तो महाराष्ट्र मध्य प्रदेश सीमेवरील आणि धुळे जिल्ह्यातील पळासनेर या गावात पिस्तुल विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती युनिटच्या पथकास मिळाली होती. त्यानंतर पथक महाराष्ट्र-मध्य प्रदेश राज्याच्या सीमेवरील धुळे जिल्ह्यात असलेल्या पळासनेर या गावात पोहचले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने पथकाने आरोपीस सापळा लावून अटक केली. यावेळी आरोपीच्या ताब्यात एक देशी बनावटीची मशीनगन, २० देशी बनावटीचे पिस्तुल, दोन मॅगझीन, २८० जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.

PUBLIC NOTICE

This is to inform the general public that Original **Share certificate no 23,** Distinctive Nos from **111 to 115** of **Bhavna A. Pardesi** a member of **Shankheshwar Palms Bldg No 4 Chs Ltd having address at Behind Model School, Kumbharkhanpada, Subhash Road, Dombivili(W) 421202** have been lost/misplaced. The member of the society has applied for duplicate shares. The Society hereby invites claims and objections from claimants/objector or objectors for issuance of duplicate Share Certificate within the period of 14 (fourteen) days from the publication of this notice, with copies of such documents and other proofs in support of his/her/their claims/objections for issuance of duplicate Share Certificate to the Secretary of **Shankheshwar Palms Bldg No 4 Chs Ltd.** If no claims/objections are received within the period prescribed above, the Society shall be free to issue duplicate Share Certificate in such manner as is provided under the bye-laws of the Society. The claims/objections, if any, received by the Society shall be dealt with in the manner provided under the bye-laws of the Society.

For and on behalf of Shankheshwar Palms Bldg No 4 Chs Ltd.
Sd/-
(Hon. Secretary)
Date: 12/07/2023
Place: Dombivli

प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञाचा मृतदेह आढळल्याने खळबळ

■ चंद्रपूर

चंद्रपूर शहरातील प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञाचा मृतदेह त्यांच्या घरात आढळल्याने एकच खळबळ उडाली. नेत्ररोगतज्ज्ञ डॉक्टर उमेश अग्रवाल यांचा त्यांच्या राहत्या घरी मृतदेह आढळला. काल संध्याकाळी त्यांनी मी झोपतो आहे. मला उठवू नका असा निरोप स्टाफला दिला व ते झोपायला गेले. त्यानंतर तासाभराने काही कामास्तव कर्मचारी त्यांना बोलवायला गेली असता ते मृतावस्थेत आढळले.

चंद्रपूर शहरातील आझाद बगीचा जवळच्या मुख्य रस्त्यावर डॉ. अग्रवाल यांचे रुग्णालय आहे. त्याच रुग्णालयाच्यावर त्यांचे घर आहे. काल संध्याकाळी ५:३० च्या सुमारास ते आपल्या स्टाफला निरोप देऊन घरी झोपायला गेले. साधारण एक तासानंतर एक रुग्ण आला. त्याला फी शुल्कात सवलत हवी असल्याने स्टाफ डॉक्टरांना उठवण्यासाठी गेली असता ते उठलेच नाही. यावेळी त्यांचा श्वासोच्छवास देखील थांबला होता. त्यांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिकदृष्ट्या स्पष्ट झाल्यानंतर त्यांना मृत घोषित करण्यात आले. डॉक्टर अग्रवाल यांच्या पत्नी देखील प्रसिद्ध दंतचिकित्सक आहेत. त्यांचा मुलगाही वैद्यकीय पदवीच्या अंतिम वर्षात शिकत आहे. हा मृत्यू नेमका कशामुळे झाला याबाबत संभ्रम आहे. पोलीस तपास सुरू आहे.

राऊतांच्या पत्रकार परिषदेत साप

■ मुंबई

भांडुप येथील निवासस्थानी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत नेहमीप्रमाणे आज सकाळी पत्रकार परिषद घेत होते. त्यावेळी त्यांच्या घराच्या आवारात साप आढळल्याने पत्रकार परिषदेत एकच गोंधळ उडाला. सुरक्षारक्षकांनी या सापाला हुसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र तो तेथून जात नव्हता. त्यानंतर राऊतांच्या निवासस्थानी सर्पमित्रांना पाचारण करण्यात आले. सर्पमित्रांनी तात्काळ या सापाला पकडले आणि नैसर्गिक अधिवासात सोडून दिले. पाणदिवड जातीचा हा बिनविषारी साप होता. या सापाला पकडल्यानंतर राऊतांसह सुरक्षा रक्षकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

जळगावात ठाकरेंविरोधात भाजपच्या कार्यकर्त्यांचे आंदोलन

■ जळगाव

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विरोधात जळगावात आंदोलन करण्यात आले. भाजप युवा मोर्चा जळगाव जिल्हा महानगरमार्फत हे निषेध आंदोलन करण्यात आले.

जळगावातील टॉवर चौकात उद्धव ठाकरे यांच्या प्रतिकात्मक बॅनरवर शाई लावून व जोडे मारून त्यांचा निषेध करण्यात आला. यावेळी महानगराध्यक्ष दीपक सूर्यवंशी, महानगर सरचिटणीस विशाल त्रिपाठी, डॉ. राधेयश्याम चौधरी, माजी महापौर सिमा भोळे, युवा मोर्चा महानगर जिल्हाध्यक्ष आनंद सपकाळे, सरचिटणीस अक्षय जेजुरकर, अध्यक्ष दीप्ती चिरमाडे, उपाध्यक्ष सचिन बाविस्कर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

विधानसभेत नमाजासाठी स्वतंत्र खोलीची मागणी

■ बंगळुरू

जनता दल विधान परिषदेचे सदस्य बी. एम. फारूक यांनी वरिष्ठ सभागृहाच्या सभापतींना पत्र लिहून कर्नाटक विधानसभेत नमाजासाठी स्वतंत्र खोलीची मागणी केली आहे. मात्र, नमाज पठणासाठी खोली देण्याच्या विनंतीला अध्यक्षांनी प्रतिसाद दिला नाही. विधी व संसदीय कामकाज मंत्री एच. के. पाटील यांनी सभागृहात बोलताना सभापती व संबंधितांची बैठक घेऊन मागणीबाबत निर्णय घेणार असल्याचे सांगितले. फारूक यांनी मागणी केली होती की, अनेकदा सभागृहात चर्चेला उशीर होतो म्हणून मी नमाजसाठी खोली मागितली. आम्ही बाहेर जाऊन नमाज अदा करू शकत नाही. मी रोज नमाज पठण करतो. त्यामुळे आम्हाला येथे एक खोली द्यावी. विशेष म्हणजे फारूक यांच्या मागणीवर भाजप सदस्यांनी कोणताही आक्षेप घेतला नाही.

जैन मुनींची हत्या करणाऱ्या आरोपींना ७ दिवसांची कोठडी

चिक्कोडी- कर्नाटकातील हिरेकुडी येथील जैन मुनी आचार्य श्री १०८ कामकुमार नंदी महाराज यांच्या हत्येप्रकरणातील दोन आरोपींना चिक्कोडी दिवाणी न्यायालयासमोर हजर करण्यात आले आणि न्यायालयाने त्यांना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. नारायण माळी व हसन दलाईत अशी आरोपींची नावे आहेत. चिक्कोडीत आरोपींना आणल्यानंतर मोठा पोलीस बंदोबस्त न्यायालय परिसरात तैनात होता. आरोपींना आणणाऱ्या वाहनांसोबत पोलिसांच्या वाहनांचाही मोठा ताफा होता. सरकारी रुग्णालयात त्यांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना न्यायालयासमोर हजर केले. याप्रकरणी आणखी पुरावे गोळा करायचे आहेत. यामुळे आरोपींना १५ दिवसांची पोलीस कोठडी द्यावी, अशी विनंती पोलिसांच्या वकीलाने केली, पण न्यायालयाने आरोपींना ७ दिवसांची कोठडी दिली.

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील मे. **विवेकानंद एज्युकेशन सोसायटी**, त्यांचे कार्यालय - सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई ४०००७१ यांनी याखालील अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेली मालमत्ता खरेदी करण्याचे ठरविले आहे.

म्हणून, कोणा व्यक्ती(क्तीं)चा वरील उल्लेखित मालमत्ता किंवा तिच्या भागामध्ये विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरू, उप भाडेकरू, धारणाधिकार, परवाना, हिस्सा, ताबा, वहिवाट, मृत्युपत्र ताबा, नियुक्ती, हायपोथिकेशन, शीर्षक हस्तांतरण किंवा कोणत्याही न्यासाअंतर्गत लाभार्थी हितसंबंध, वहिवाटीचा अधिकार किंवा कोणत्याही करार किंवा अन्य रचनेअंतर्गत पूर्व खरेदी किंवा कोणत्याही हुकूम, आदेश किंवा निवाड्याअंतर्गत कोणताही दावा असल्यास किंवा अन्य मार्गे कशाही प्रकारे दावा करीत असल्यास, त्यांना याद्वारे विनंती आहे की, त्यांनी त्याबाबत सहाय्यक कागदपत्रांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना खाली दिलेल्या पत्त्यावर या प्रसिद्धीच्या १४ दिवसांच्या कालावधीमध्ये (दोन्ही दिवस समाविष्ट) सूचित करावे, असे न केल्यास अशा व्यक्ती(क्तीं)चा दावा सोडून दिला किंवा गुंडाळून ठेवला असे समजण्यात येईल.

अनुसूची

लिटिल मलबार हिल, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे स्थित असलेल्या आणि वसलेल्या गाव चेंबूरचा सी.टी.एस. क्र. २७० आणि २७० (१) धारण केलेल्या प्लॉट क्र. ७७ मोजमाप ५४८.१० चौरस मीटर्स या मोठ्या जमिनीचा १/३ भाग असलेल्या जमिनीच्या तुकड्यावर बांधलेल्या स्टिल्ट अधिक २ (दोन) वरील मजले समाविष्ट असलेल्या सुखसागर ("सदर बंगलो") मोजमाप १८३० चौरस फूट (बिल्ट अप क्षेत्रफळ) या संरचनेसह जमीन किंवा मैदानाचे सर्व खंड आणि तुकडे व त्यासह सिंधी इमिग्रंट्स कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. द्वारे सदर मालमत्तेच्या संदर्भात डिस्टिंक्टीव्ह क्र. **२६६ ते २७० धारण केलेल्या भाग प्रमाणपत्र क्र. ५४** नुसार पारितसर्व समभाग, शीर्षक आणि हितसंबंधांसह मोठ्या जमिनीच्या एफएसआय आणि टीडीआर (विद्यमान आणि भविष्यातील) मधील १/३ अविभक्त हक्क, शीर्षक आणि हितसंबंध (**"सदर १/३ अविभक्त हक्क एफएसआय आणि टीडीआरमध्ये समाविष्ट आहेत"**) आणि त्याच्या चतु:सीमा:

पूर्वेस किंवा त्यादिशेने	: प्लॉट क्र. ७८
दक्षिणेस किंवा त्यादिशेने	: डी.पी.रोड द्वारे
पश्चिमेस किंवा त्यादिशेने	: प्लॉट क्र. ७७बी
उत्तरेस किंवा त्यादिशेने	: प्लॉट क्र. ७७सी

ठिकाण: मुंबई
दिनांक: १३.०७.२०२३

सही/-
(सागर ए. शहानी)
बी.एलएस., एलएल.बी, एलएलएम
वकील, भारताचे सर्वोच्च न्यायालय
शहानी लॉ चेंबर्स
पत्ता: १/ए, शिव रतन, रोड क्र. २,
४५, सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२.
मोबाईल क्र. ९८२०००८२१०
ईमेल: shahanilawchambers@gmail.com

जाहीर सूचना

श्री. अकबर शहादत खान हे माऊंट व्ह्यू को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. ८, भवानी नगर, मरोळ मरोशी मार्ग, मरोळ, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९ चे संयुक्त सदस्य आणि संस्थेच्या इमारत क्र. ३, माऊंट व्ह्यू को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. मधील पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र. ४ चे संयुक्त धारक होते. श्री. अकबर शहादत खान यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता दि. १८.०७.२०२० रोजी निधन झाले.

त्यांच्या पत्नी सौ. कमल अकबर खान आणि त्यांची मुलगी सौ. हज्जू खान संयुक्तपणे (२५%-२५% समभाग प्रत्येकी) यांनी सदर सदनिका आणि संस्थेच्या सदस्यतेमधील त्यांचा हिस्सा संप्रेषण हस्तांतरणाअंतर्गत त्यांच्या नावे हस्तांतरित करण्याकरिता दावा आणि अर्ज केला आहे.

संस्था याद्वारे दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास वारस किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदारांकडून/ आक्षेपदार किंवा आक्षेपदारांकडून सदर सूचना प्रसिद्धीपासून १५ दिवसांच्या कालावधीमध्ये दावे आणि आक्षेप, दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणास त्याच्या/तिच्या/ त्यांच्या दाव्याच्या/आक्षेपाच्या समर्थनार्थ अशी कागदपत्रे आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह, मागवित आहे. वरील विहीत कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, संस्था दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाबाबत संस्थेच्या उप-विधीमध्ये देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास मुक्त असेल. दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणाबाबत जर कोणतेही दावे/आक्षेप संस्थेस प्राप्त झाल्यास संस्थेच्या उप-विधीमध्ये देण्यात आलेल्या पद्धतीने त्यावर निर्णय घेतला जाईल.

सही/- मान. सचिव
माऊंट व्ह्यू को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.,
प्लॉट क्र. ८, भवानी नगर,
मरोळ मरोशी मार्ग, मरोळ,
अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १३.०७.२०२३

PUBLIC NOTICE

Notice is hereby given that the following share certificates are registered in my name has been lost. Therefore, I have applied for issue of duplicate share certificate to the **GFL LTD**, having its registered office at 7th Floor, Ceejay House, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai, Maharashtra, 400018. So, general public are hereby warned about not to deal with the following securities and if company do not receive any objection within 15 days from the date of publication of this notice on above-mentioned regd.address/of the company, or to the company's R&T Agent LinkIntime India Pvt Ltd, **GFL LTD** (B-102 & 103, Shangrila complex, First floor, Opp HDFC Bank, Near Radhakrishna Char Rasta, Akota, Vadodara-390020), The company will proceed for the issue of Duplicate share certificate(s) in its name.

SR NO.	FOLIO NO	NAME OF SHAREHOLDERS	DISTINCTIVE NO.	CERTI NO / S	SHARES (QTY)	F.V
1	00002976	P. S. KATARIA HUF	1203701 - 1205700	788	2000	1/-

Sd/-
Date:
Place:
PRAVINDRA SINGH KATARIA KARTA OF P. S KATARIA HUF

फॉर्म बी
जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

ग्लोबल गॅलरी एजन्सीज प्रा. लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

अ.क्र.	तपशील	वर्णन
१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**ग्लोबल गॅलरी एजन्सीज प्रा. लिमिटेड**
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	२९ जुलै, २००६
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले	आरओसी - मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक	U51909MH2006PTC163411
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता	स्वस्तिक हाय पॉईंट ग्लोरिया, देवचंद हाऊसिंग कंपाऊंड, अरिहंत प्लाझाशेजारी, घोडबंदर रोड, ओवला, ठाणे पश्चिम - ४००६०७.
६.	दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक	०३.०६.२०१८
७.	कॉर्पोरेट कर्जदाराचे परिसमापन सुरु होण्याचा दिनांक	०३.०७.२०२३ (आदेश ११.०७.२०२३ रोजी प्राप्त)
८	परिसमापक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता	धीरेन एस शाह IBBI/IPA-001/IP-P00220/2017-18/10419
९	मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल	बी १०२ भागिरथी निवास, नटराज स्टुडियोजवळ, सर एम व्ही मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९. ईमेल - dss@dsshah.in
१०	परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	७०२ मातुश्री अपार्टमेन्ट, नटराज स्टुडियोजवळ, सर एम व्ही मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९. ईमेल - liqglobal@gmail.com
११	दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक	०२.०८.२०२३

याद्वारे सूचना देण्यात येते की, मान. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दि. **०३.०७.२०२३ (आदेश ११.०७.२०२३ रोजी प्राप्त)** रोजी **ग्लोबल गॅलरी एजन्सीज प्रा. लिमिटेडचे** परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

ग्लोबल गॅलरी एजन्सीज प्रा. लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ०२.०८.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकांकडे बाब क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

परिसमापकाचे नाव आणि स्वाक्षरी : सही/- धिरेन एस. शाह
दिनांक आणि ठिकाण : १३.०७.२०२३, मुंबई

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये त्वरीत वसुल न करता येणाऱ्या मालमत्ता नियुक्ती तत्त्वावर घेण्याकरिता पात्र संभाव्य सहभागींकडून स्वारस्य अभिव्यक्ती मागविणारी जाहिर सूचना

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)
सीआयएन: **U45400MH2007PTC2342975**
नोंद. कार्या.: स्वस्तिक चेंबर्स, ६ वा मजला, शीव तुर्भे मार्ग,
चेंबूर, मुंबई महा. ४०००७१.
ईओआय सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. २८.०७.२०२३ रोजी सायं. ०६.०० वाजता

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ ("संकेत") भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ ("विनियमन") च्या तरतुदीनुसार त्वरीत वसुल न करता येणाऱ्या मालमत्ता (एनआरआरए) समजण्यात आलेल्या केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तांच्या **"जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** नियुक्तीकरिता स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याकरिता जनतेस सूचना देण्यात येत आहे.

केएसएसचे परिसमापक, संकेत आणि विनियमनांच्या तरतुदींनुसार केएसएसच्या एनआरआरएशी संबंधित सर्व हक्क, हितसंबंध/परिणाम आणि दायित्वे बोलींच्या सादरीकरणाद्वारे नियुक्तीकरिता प्रस्ताव देत आहेत. पात्र सहभागींकडून केएसएसचे एनआरआरए नियुक्ती तत्त्वावर आणि दिनांक १३.०७.२०२३ रोजीच्या प्रक्रिया कागदपत्रांमध्ये दिलेल्या अटी आणि शर्तीनुसार घेण्याकरिता त्यांचे स्वारस्य सादर करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती मागवित आहेत. मालमत्तांचा तपशील आणि एनआरआरएच्या नियुक्तीकरिता परिसमापकाद्वारे ठरविलेली प्रक्रिया केएसएसची वेबसाईटः www.ksspetron.in येथे देण्यात आलेली आहे आणि उपलब्ध आहे. संभाव्य सहभागींना सल्ला आहे की त्यांनी प्रक्रिया दस्तऐवजामधील अटी आणि शर्ती पूर्णपणे पहाव्या.

१) इच्छुक पात्र प्रक्रिया अर्जदारांनी त्यांची स्वारस्य अभिव्यक्ती वेबसाईटवर उपलब्ध प्रक्रिया कागदपत्रानुसार दि. २८.०७.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावी.

२) त्वरीत वसुल न करता येणाऱ्या मालमत्तांची (एनआरआरए) यादी, स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याकरिता प्रक्रिया, इसारा रक्कम अनामत, वेळापत्रक आणि संबंधित अटी आणि शर्तीच्या संदर्भात अधिक तपशिलाकरिता, कृपया कॉर्पोरेट ऋणकोच्या वेबसाईटः www.kssptron.in वर उपलब्ध दिनांक १३.०७.२०२३ रोजीचे प्रक्रिया माहिती दस्तऐवज पहावे.

३) पुढील अन्य माहिती किंवा स्पष्टीकरणाकरिता, तुम्ही कृपया परिसमापक यांना ०११-४९१२१६४४-४५ येथे किंवा त्यांचे संघ सदस्य, श्री. विशाल नागपाल यांना +९१ ९९९९४४७५२ येथे संपर्क साधावा.

केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेडकरिता

सही/-
सीएस विनीत के चौधरी
परिसमापक
केएसएस पेट्रॉन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रकरणात
आयबीबीआय नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00103/2017-18/10246
एएफए वैधता दि. २३.११.२०२३ पर्यंत
Liquidatorksspetron@vkcindia.com (प्रक्रिया विशिष्ट)
ip.vineetchaudhary@gmail.com (आयबीबीआयकडे नोंदणीकृत)
परिसमापक यांचा आयबीबीआयकडे नोंदणीकृत पत्ता:
डी-३८, एलजीएफ (एल/एस), दक्षिण विस्तार, भाग-II, नवी दिल्ली-११००४९

दिनांक: १३.०७.२०२३
ठिकाण: नवी दिल्ली

नवी मुंबई महानगरपालिका

शहर अभियंता विभाग

निविदा सूचना क्र. नमुंमपा/श.अ./ 142 /2023-24

अ. क्र.	कामाचे नांव	अंदाजपत्रकिय रक्कम (रू.)
1	केंद्र शासनाच्या अमृत 2.0 अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बेलापूर विभागातील सेक्टर 20 व 25 येथे मलउदंचन केंद्र बांधणे व सेक्टर 6 बेलापूर येथील मलउदंचन केंद्रामधील पंपिंग मशिनरी बदलणे.	18,69,35,585/-
2	केंद्र शासनाच्या अमृत 2.0 अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नेरुळ विभागातील सेक्टर-1अे शिरवणे येथे मलउदंचन केंद्र बांधणे व सेक्टर-4 नेरुळ येथील मलउदंचन केंद्रामध्ये नवीन पंपींग मशीनरी पुरविणे.	9,10,36,136/-
3	केंद्र शासनाच्या अमृत 2.0 अभियानांतर्गतनवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील तुर्भे विभागातील सेक्टर-9 सानपाडा येथे मलउदंचन केंद्र बांधणे व सेक्टर-30 वाशी येथील मलउदंचन केंद्रामध्ये नवीन पंपींग मशीनरी पुरविणे.	9,25,26,474/-
4	केंद्र शासनाच्या अमृत 2.0 अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाशी विभागातील सेक्टर-3, सेक्टर-12 व सेक्टर-28 वाशी येथे मलउदंचन केंद्र बांधणे.	22,16,72,195/-

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणकप्रणालीच्या https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर व नमुंमपाच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक- 13 / 07 / 2023 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
(संजय देसाई)
शहर अभियंता
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/418/2023
नवी मुंबई महानगरपालिका

फॉर्म ए
सार्वजनिक उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ)
(कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियम २०१६ च्या नियम ६ अंतर्गत)

सिमन्स शिपींग प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्यासाठी

प्रस्तुत तपशिल

१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	सिमन्स शिपींग प्रायव्हेट लिमिटेड
२	कोर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	०९-०१-२००८
३	प्राधिकारी ज्यांच्या अंतर्गत कोर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी करण्यात आली आहे.	आरओसी - मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र. / मयादित दायीत्व ओळख क्र.	U63032MH2008PTC177615
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (असल्यास) पत्ता	एम-१, देव प्रयाग, भक्ति मंदिर रोड, पाचपारवाडी, ठाणे (प.) - ४०० ६०२.
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संबंधात दिवाळखोरी प्रारंभाची तारीख	आदेश घोषित : १०-०७-२०२३ रोजी आदेश प्राप्त : ११-०७-२०२३ रोजी
७	नादारी विभेदन प्रक्रिया बंद होण्याची अनुमानित तारीख	०७-०१-२०२४
८	अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यवसायीकाचे नाव आणि नोंदणी क्र.	स्नेहल कामदार IBBI/IPA-001/IP-P00415/2017-18/10738
९	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कायरत नादारी व्यवसायिकाचा पत्ता आणि ईमेल	३०१-३०२, पुनम पर्ल, हिमाचल सोसायटीच्या पुढे, न्यू इंडिया कॉलनीच्या समोर, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०० ०५८ ई-मेल : snehal.kamdar@jjkandco.com
१०	अंतरिम विभेदन व्यवसायिकासोबत संपर्कासाठी वापरण्यात येणारा पत्ता आणि ईमेल	पत्ता : ३०१-३०२, पुनम पर्ल, हिमाचल सोसायटीच्या पुढे, न्यू इंडिया कॉलनीच्या समोर, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०० ०५८ ई-मेल : cirp.simonsshipping@gmail.com
११	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	२५-०७-२०२३
१२	अंतरिम विभेदन व्यवसायिकाद्वारे निर्धारित, सेक्शन २१ च्या उप - सेक्शन (६ए) च्या कलम (बी) अंतर्गत काही असल्यास, धनकोंचे प्रवर्ग	निरंक
१३	प्रवर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी अभिज्ञात नादारी व्यवसायिकाचे नाव (प्रत्येक प्रवर्गासाठी तीन नावे)	लागू नाही
१४	(अ) संबंधित प्रपत्र आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे :	वेब लिंक : https://ibbi.gov.in/ भौतिक पत्ता : ३०१-३०२, पुनम पर्ल, हिमाचल सोसायटीच्या पुढे, न्यू इंडिया कॉलनीच्या समोर, अंधेरी पश्चिम, मुंबई - ४०० ०५८

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने सिमन्स शिपींग प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट नादारी विभेदन प्रक्रिया प्रारंभ करण्याचा आदेश १०-०७-२०२३ रोजी दिला आहे.

सिमन्स शिपींग प्रायव्हेट लिमिटेड्च्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यांसोबत २५-०७-२०२३ रोजी किंवा तत्पूर्वी अंतरिम विभेदन व्यवसायिकांकडे त्यांच्या मुद्दा क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

वित्तीय धनकोनी त्यांच्या पुराव्यासोबतचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे प्रस्तुत करावेत. अन्य सर्व धनको त्यांचे पुराव्यासोबतचे दावे व्यक्तीशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सादर करू शकतील.

मुद्दा क्र. १२ समक्ष नमूद अनुसार, प्रवर्ग संबंधित वित्तीय धनको, प्रवर्गाचे अधिकृत प्रतिनिधी (निरंक) म्हणून कार्य करण्यासाठी मुद्दा क्र. १३ समक्ष सुचिबध्द तीन नादारी व्यवसायीकाकडून त्याच्या अधिकृत प्रतिनिधीची निवड प्रपत्र सीए मध्ये दर्शवतील.

खोटा किंवा दिशाभूल करणारा दाव्याचा पुरावा सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यास पात्र राहील.

अंतरिम आदेश व्यवसायिकाचे नाव आणि स्वाक्षरी : सही/- स्नेहल कामदार
दिनांक आणि स्थळ : १३-०७-२०२३ रोजी मुंबई येथे

फॉर्म ए
सार्वजनिक उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ)
(कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियमन २०१६च्या नियम ६ अंतर्गत)

डॉल्फीन ऑफशोअर शिपींग लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्यासाठी

प्रस्तुत तपशिल

१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	डॉल्फीन ऑफशोअर शिपींग लिमिटेड
२	कोर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	03-09-1990
३	प्राधिकारी ज्यांच्या अंतर्गत कोर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी करण्यात आली आहे.	कंपनी निबंधक, महाराष्ट्र (मुंबई) यांच्याकडे नोंदणीकृत, कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत विधीस्थापित कंपनी,
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र. / मर्यादित दायित्व ओळख क्र.	U51900MH1990PTC057967
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (असल्यास) पत्ता	नोंदणीकृत कार्यालय : १००१, रहेजा सेंटर २१४, नरीमन पॉईंट, एनए मुंबई, महाराष्ट्र ४०००२१, भारत मुख्य कार्यालय : ७०१/७०२ लखानी सेंट्रीम, प्लॉट क्र. २७, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर (पूर्व), नवी मुंबई, महाराष्ट्र ४००६१४, भारत
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संबंधात दिवाळखोरी प्रारंभाची तारीख	माननीय एनसीएलटी, मुंबई शाखेद्वारे आदेशाची घोषणा ०६.०७.२०२३ रोजी करण्यात आली होती, तथापी, अंतरिम विभेदन व्यवसायिकांना सदर आदेशाची माहिती **११.०७.२०२३** रोजी मिळाली.
७	नादारी विभेदन प्रक्रिया बंद होण्याची अनुमानित तारीख	०२.०१.२०२४
८	अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यवसायीकाचे नाव आणि नोंदणी क्र.	**श्री. केदार सोमनाथ पांडे** आयबीबीआय नोंदणी क्र. IBBI/IPA-001/IP-P-02763/2022-23/14270
९	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कायरत नादारी व्यवसायिकाचा पत्ता आणि ईमेल	फ्लॅट क्र. ७, सुरभी अपार्टमेंट, जाधवमंडी, कुवरफल्ली, राजाबाजार, विमलनाथ जैन मंदिराच्या समोर, औरंगाबाद, महाराष्ट्र, ४३१००१. ई-मेल : kedarpande@gmail.com
१०	अंतरिम विभेदन व्यवसायिकासोबत संपकासाठी वापरण्यात येणारा पत्ता आणि ईमेल	फ्लॅट क्र. ७, सुरभी अपार्टमेंट, जाधवमंडी, कुवरफल्ली, राजाबाजार, विमलनाथ जैन मंदिराच्या समोर, औरंगाबाद, महाराष्ट्र, ४३१००१. ई-मेल : dolphincirp@gmail.com
११	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	२५-०७-२०२३
१२	अंतरिम विभेदन व्यवसायिकाद्वारे निर्धारित, सेक्शन २१ च्या उप - सेक्शन (६ए) च्या कलम (बी) अंतर्गत काही असल्यास, धनकोंचे प्रवर्ग	लागू नाही
१३	प्रवर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी अभिज्ञात नादारी व्यवसायिकाचे नाव (प्रत्येक प्रवर्गासाठी तीन नाव)	लागू नाही
१४	(अ) संबंधित प्रपत्र आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे :	वेब लिंक : https://ibbi.gov.in/home/downloads लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने डॉल्फीन ऑफशोअर शिपींग लिमिटेडची कॉर्पोरेट नादारी विभेदन प्रक्रिया प्रारंभ करण्याचा आदेश ०६.०७.२०२३ रोजी दिला आहे.

डॉल्फीन ऑफशोअर शिपींग लिमिटेडच्या धनकोंना, याद्वारे त्याचे दावे पुराव्यांसोबत २५-०७-२०२३ रोजी किंवा तत्पूर्वी अंतरिम विभेदन व्यवसायीकांकडे त्यांच्या मुद्दा क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

वित्तीय धनकोनी त्यांच्या पुराव्यासोबतचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे प्रस्तुत करावेत. अन्य सर्व धनको त्यांचे पुराव्यासोबतचे दावे व्यक्तीशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सादर करू शकतील.

मुद्दा क्र. १२ समक्ष नमूद अनुसार, प्रवर्ग संबंधित वित्तीय धनको, प्रवर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यासाठी मुद्दा क्र. १३ समक्ष सुचिबध्द तीन नादारी व्यवसायीकाकडून त्याच्या अधिकृत प्रतिनिधीची निवड प्रपत्र सीए मध्ये दर्शवतील.

खोटा किंवा दिशाभूल करणारा दाव्याचा पुरावा सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यास पात्र राहील.

सही/-
केदार सोमनाथ शिंदे
अंतरिम विभेदन व्यवसायिक
IBBI/IPA-001/IP-P-02763/2022-23/14270
डॉल्फीन ऑफशोअर शिपींग लिमिटेड करिता (सीआयआरपी अंतर्गत)
दिनांक :- १३/०७/२०२३
स्थळ :- औरंगाबाद